**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८९/ख**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय मुंबई-४०००३२
दिनांक : ०३/०१/२०१८

वाचा :-

१) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक : गौखनि १०/०५१२/प्र.क्र.३००/ख, दिनांक : १२ मार्च, २०१३
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक : गौखनि १०/०५१२/प्र.क्र.३००/ख, दिनांक : १९ ऑक्टोंबर, २०१३
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक : गौखनि १०/१०१४/प्र.क्र.४९८/ख, दिनांक : २६ डिसेंबर, २०१४
४) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक : गौखनि १०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दिनांक : २१ मे, २०१५
५) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक : गौखनि १०/१०१४/प्र.क्र.४९८/ख, दिनांक : १६ ऑक्टोबर, २०१५
६) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण ५
७) केन्द्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना दि. १५.१.२०१६

**प्रस्तावना :**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक १९६२८-१९६२९/२००९ मध्ये दिनांक २७.२.२०१२ रोजी दिलेले आदेश, माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्रमांक ०१/२०११, जनहित याचिका क्रमांक ११६/२०१२ आणि जनहित याचिका क्रमांक २०२/२०१३, ७९/२०१४ व ८२/२०१४ मधील आदेश, वाळू/ रेती निर्गती धोरणाच्या अंमलबजावणीतील अडचणी इत्यादी बाबींचा साकल्याने विचार करून खालील उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी शासनाने संदर्भाधीन दिनांक १२ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयाद्वारे वाळू/रेती निर्गती सुधारित धोरण विहित केले होते.

अ) पर्यावरण संतुलन राखत समतोल व स्थायी विकास साधणे आणि या प्रक्रियेत लोकांना अधिकाधिक प्रमाणात सहभागी करून घेणे,

आ) वाळू/रेती उत्खननाचा पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यांच्या हिताचे रक्षण करतानाच, वाळू/रेतीगटाच्या लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणणे

इ) अवैध उत्खनन व वाहतुकीच्या घटनांना प्रभावीपणे आळा घालून राज्याच्या महसूलात वाढ करणे,

२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण ५ मध्ये, नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू/रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून, नियम ७० मध्ये,

“लिलाव, विनियोग इत्यादीच्या अटी व शर्ती यासंबंधातील कार्यपध्दती शासनाकडून वेळोवेळी सूचनांच्याद्वारे विर्निदीष्ट करण्यात येईल,” अशी तरतूद केली आहे.

३. माननीय राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी अर्ज क्र. ३४/(टीएचसी)/२०१३(डब्ल्यूझेड) मध्ये दिनांक २९.०५.२०१४ रोजी कोकण विभागातील सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून (Coastal Regulation Zone) नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननासंदर्भात आदेश पारित केले होते. त्याअनुषंगाने सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती करण्यासंबंधीचे सूस्पष्ट धोरण तयार करुन, एम.ए.क्र. ३८/२०१५ अन्वये, मा. न्यायाधिकरणास सादर केले होते. सदर धोरणास मा. न्यायाधिकरणाने दिनांक १८/०५/२०१५ रोजी मान्यता दिल्यानंतर, यासंबंधीचा शासन निर्णय दिनांक २१.०५.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

४. केन्द्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक १५.०१.२०१६ च्या अधिसूचनेन्वये, गौण खनिजाच्या उत्खननासाठी पर्यावरण अनुमतीसाठी जिल्हास्तरवर समित्यांची स्थापना करणे, गौण खनिज उत्खननासाठी पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव विहीत नमुन्यात जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करणे, नदीपात्रातील वाळू उत्खननासाठी तसेच इतर गौण खनिजासाठी जिल्हा सर्वेक्षण अहवाल तयार करणे, नदीपात्रातील वाळू उत्खननाबाबत सनियंत्रणाची प्रक्रिया याबाबत तरतुदी केल्या आहेत.

५. उपरोक्त दिनांक १२.०३.२०१३ च्या वाळू/रेती निर्गती धोरणाची अंमलबजावणी करताना निदर्शनास आलेल्या काही त्रुटी व उणीवा तसेच वाळूच्या अवैध उत्खननास परिणामकारक आळा घालून राज्याच्या महसुलात ठोस वाढ करण्याची आवश्यकता या सर्व बाबींचा विचार करून राज्यातील नदीपात्रातील वाळू / रेती उत्खननाबाबत सर्वसमावेशाक असे परिणामकारक सुधारित धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या काही काळ विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, वाळू/रेती निर्गती विषयक धोरणाबाबतचे संदर्भाधीन शासन निर्णय दि. १२.०३.२०१३, दि. १९.१०.२०१३, दि. २६.१२.२०१६ व दिनांक १६.१०.२०१५ अधिक्रमित करुन, राज्यातील नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासंदर्भात सुधारित कार्यपध्दती अवलंबविण्याकामी पुढीलप्रमाणे नव्याने मार्गदर्शक तत्वे शासन विहित करीत आहे:-

**१. वाळू / रेती निर्गतीसाठी अनुसरावयाची सर्वसाधारण कार्यपध्दती :-**

(अ) राज्यातील नदीपात्रातील वाळू/रेतीची निर्गती लिलावाद्वारे (ई-टेंडरिंग / ई-ऑक्शन पध्दतीने) करण्यात यावी.

(ब) हातपाटी/डूबी यासारख्या पारंपारिक पध्दतीने वाळू उत्खननासाठी चिन्हांकित केलेल्या वाळूगटामधील उत्खननासाठी स्थानिक व्यक्तींना तसेच स्थानिक व्यक्तीच्या संस्थांना परवाना देऊन उक्त पारंपारिक पध्दतीने वाळूची निर्गती करता येईल.

२. अ-१ वाळू/रेती गट निश्चितीसाठी निकष :-

(१) वाळूगटास पर्यावरण अनुमती घेण्यापूर्वी खाणकाम आराखडा (Mining Plan) तयार करावा.

(२) वाळूगट / रेतीगट निर्धारित करण्यापुर्वी नदी प्रवाहाचा अभ्यास तसेच अवसार (Sediments) निर्मिती व निक्षेप (Deposition) यांचा सारासार विचार करण्यात यावा.

(३) राज्यातील नदीपात्रातील वाळूगट निश्चित करताना गाव नकाशानुसार वाळू उपलब्ध असणाऱ्या नदीच्या पात्राची लांबी निश्चित करण्यात यावी.

(४) लहान लहान वाळुगट निश्चित न करता शक्यतोवर एकच सलग वाळूगट निश्चित करण्यात यावा.

(५) एकापेक्षा जास्त वाळूगट निश्चित करताना दोन्ही वाळूगटामध्ये किमान २०० मीटरचे अंतर राहील याची दक्षता घेण्यात यावी.

(६) वाळूगट निश्चित करताना नदी अंतर्गोल वळण घेते त्याच्या आतील बाजूला वाळूचा साठा नैसर्गिकरित्या जमा होतो ही बाब विचारात घेऊन काळजीपूर्वक वाळूगट निश्चित करण्यात यावा. एखाद्या गावातील वाळूगटाच्या समोर असा वाळूसाठा असेल तर दुसऱ्या वाळूगटाची सीमारेषा काळजीपूर्वक निश्चित करण्यात यावी.

(७) एखादा वाळूगट एका जिल्हयातील दोन तालुक्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर असा वाळूगट सुंयक्त वाळूगट म्हणून निश्चित करुन त्याचा लिलाव जिल्हाधिकारी यांनी करावा.

(८) एखादा वाळूगट एका महसूल विभागातील दोन जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन त्याची संयुक्त वाळूगट म्हणून निश्चिती करावी आणि यासंबंधीचा अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावा. तद्नंतर विभागीय आयुक्त दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास अशा संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण करावी. अशा लिलावात प्राप्त रक्कम वाळूगटाच्या परिमाणानुसार दोन्ही जिल्ह्यांमध्ये मानीव विभाजन करुन शासनजमा करण्यात यावी.

(९) एखादा वाळूगट दोन महसूल विभागामधील दोन जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर अशा प्रकरणांत सुध्दा दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन, यासंबंधीचा अहवाल संबंधित दोन्ही विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त हे सल्लामसलत करुन, दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास लिलावाची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण करावी. अशा लिलावात प्राप्त रक्कम वाळूगटाच्या परिमाणानुसार दोन्ही जिल्ह्यांमध्ये मानीव विभाजन करुन शासनजमा करण्यात यावी.

अशा संयुक्त वाळूगटाच्या लिलावाविषयी दोन्ही विभागीय आयुक्त यांचे एकमत न झाल्यास त्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर करण्यात यावा.

(१०) अवर्षण व सतत टंचाईग्रस्त भागात वाळू उत्खननामुळे पर्यावरण तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्यास अशा भागात वाळू /रेती गट निश्चित करु नये.

(११) बारमाही पाणी असलेल्या वाळू/रेती गटाची निश्चिती करताना सार्वजनिक हितार्थ अपवादात्मक परिस्थितीत पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पाण्याखालील वाळू साठ्याचे उत्खनन करणे आवश्यक आहे अशा ठिकाणीच वाळूगट निश्चित करण्यात यावेत.

(१२) जलसंपदा विभागाने शासन निर्णय क्रमांक मेरीना-२०१४/प्र.क्र.१८२/१४ लाक्षेवी (आस्था), दिनांक ०४/०५/२०१७ व शासन निर्णय क्रमांक लाक्षेवी २०१७/(६७/२०१७)/ लाक्षेवी (आस्था), दिनांक २४/०५/२०१७ अन्वये धरणाच्या बुडीत क्षेत्रातील वाळूगटाचे निष्कासन करण्यासाठी धोरण व कार्यपध्दती विहित केली आहे. त्यामुळे धरणाच्या बुडीत क्षेत्रात वाळूगट निश्चित करण्यात येऊ नये.

(१३) रेल्वेपुल व रस्तेपुलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स अंतर सोडूनच वाळूगट निश्चित करण्याची संबंधित तहसिलदार यांनी दक्षता घ्यावी.

## अ-२ वाळू/रेती गट निश्चितीसाठी वाळूगटांची पाहणी करणे :-

(१) वाळूगट निश्चित करण्याकरिता तहसिलदारांनी दरवर्षी १० एप्रिलपर्यंत तालुक्यातील नदीपात्रातील वाळूबाबत व्यक्तीश: पाहणी करून वरील निकषानुसार वाळूगट निश्चितीबाबत उपविभागीय अधिकारी यांना अहवाल सादर करावा.

(२) उप विभागीय अधिकाऱ्यांनी तहसिलदार यांनी वाळूगट निश्चितीबाबत सादर केलेल्या अहवालातील किमान २५ टक्के वाळूगटांची दि. ११ ते २० एप्रिल दरम्यान प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करुन वाळूगटाची निश्चिती यथायोग्य करण्यात आली आहे याची खात्री करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा व त्याची प्रत जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांकडे ही द्यावी.

(३) जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी उप विभागीय अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार जिल्हयातील एकूण वाळूगटांपैकी किमान १० टक्के वाळूगटांना दि. २१ ते ३० एप्रिल या कालावधीत भेट देऊन पाहणी करावी व वाळूगटाची निश्चिती यथायोग्य करण्यात आली आहे याची खात्री करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा.

(४) उप विभागीय अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी वाळूगटाची पाहणी करण्यासाठी शक्यतो मोठया वाळूगटाची निवड करावी.

## अ-३. नव्याने निश्चित करावयाच्या वाळू/रेती गटाचे सर्वेक्षण व निश्चिती :-

(१) अ-१ व अ-२ मधील कार्यपध्दतीनुसार पाहणी करण्यात आलेल्या वाळूगटांची यादी जिल्ह्यातील वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांना दिनांक ७ मे पर्यंत देण्यात यावी.

(२) वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा खनिकर्म अधिकारी व तहसिलदार यांनी संयुक्तपणे सदर वाळूगटातील वाळू/रेती उत्खननामुळे जलस्त्रोतावर होणाऱ्या परिणामाबाबत मे महीन्यात सर्वेक्षण करुन त्याबाबतचा अहवाल ७ जून पर्यंत जिल्हाधिकारी यांना सादर करावा. वाळूगटाच्या सर्वेक्षणाच्या वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

(३) सदर सर्वेक्षणाच्यावेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी व तहसिलदार यांनी वाळूगटात किती वाळू उपलब्ध होऊ शकेल याची निश्चिती करुन त्याबाबतचा अहवाल ७ जून पर्यंत जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

(४) सर्वेक्षणाच्यावेळी वाळू/रेतीच्या उत्खननामुळे नदीपात्रालगतच्या विहिरीच्या पाण्याच्या पातळीत काही फरक होतो किंवा कसे तसेच पर्यावरणविषयक इतर बाबीही विचारात घेण्यात याव्यात.

(५) नदी प्रवाहाचा व परिसरातील पर्यावरणाचा समतोल राखून वाळू / रेतीगट निश्चित करण्यात यावे.

(६) वाळूगटाची निश्चिती केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यासंबंधीची माहिती ११ ते २५ जून या दरम्यान सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, उप विभागीय अधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालयातील सूचना फलकावर लावावी व त्याची एक प्रत शासनास सादर करावी. तसेच सदर यादी शासनाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करावी.

(७) सदर वाळूगटाबाबत जनतेकडून आक्षेप प्राप्त झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी सदर आक्षेप तपासून सदर वाळूगटाचा लिलाव करावा किंवा करु नये याबाबतचा प्रस्ताव ३० जुनपर्यंत जिल्हास्तरीय समितीपुढे सादर करावा. जिल्हास्तरीय समितीने सदर प्रस्तावावर १५ जुलै पर्यंत निर्णय घेऊन, संबंधित जिल्हाधिकारी यांना कळवावा.

(८) जिल्हाधिकारी यांनी संबधित वाळूगटाचे भौगोलिक स्थान, वाळूसाठ्याचे परिक्षेत्र, उपलब्ध होऊ शकणारा अंदाजीत वाळूसाठा, उत्खननाची खोली व उपलब्ध पोच मार्ग निश्चित करावे.

(९) मागील वर्षी विहीत कार्यपध्दतीस अनुसरुन लिलावात ठेवण्यात आलेले, तथापि लिलावात न गेलेल्या वाळूगटाचे पुन्हा सर्वेक्षण व वाळूगट निश्चित करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(१०) नव्याने निश्चित केलेल्या व मागील वर्षी लिलावात न गेलेल्या वाळूगटाच्या लिलावासाठी ग्रामसभेचे ना-हरकत प्रमाणपत्र, पर्यावरण अनुमती व हातच्या किंमतीस विभागीय आयुक्त यांची मान्यता ऑगस्ट अखेरपर्यंत प्राप्त करुन, सप्टेंबर अखेरपर्यंत वाळूगटाच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी व दि. १ ऑक्टोबर रोजी वाळूगटाचे ताबे संबंधित लिलावधारकास देण्यात यावे.

(११) उत्खनन सुरु असलेल्या वाळूगटाचे पुढील वर्षाच्या लिलावासाठी वाळूगटाची पाहणी, वाळूगट निश्चिती, सर्वेक्षण, ग्रामसभेची मान्यता व पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही ऑक्टोबर महिन्यात पूर्ण करुन, नोव्हेंबर महिन्यात लिलाव करण्यात यावे.

**३. वाळू/रेती लिलावाकरीता ग्रामसभेची शिफारस व ग्रामपंचायतीस द्यावयाचा निधी :-**

(१) नदीपात्रातील वाळू/रेतीगट निश्चित केल्यानंतर सदर वाळूगटाच्या लिलावासाठी दिनांक १५ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान ग्रामसभेची शिफारस घेण्यात येईल.

(२) वर नमूद कालावधीत ग्रामसभा बोलावून त्यावर निर्णय घेणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक राहील. या कालावधीत निर्णय प्राप्त न झाल्यास ग्रामसभेची मानीव सहमती (Deemed concurence) गृहित धरून लिलावाची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) ग्रामसभेने लिलाव करण्यास शिफारस न केल्यास त्याची सबळ कारणे देणे अनिवार्य राहील.

(४) वाळू/रेती गटाच्या लिलावामध्ये ग्रामपंचायतीस सहभागी करुन घेण्याच्या अनुषंगाने संबंधित गावच्या ग्रामसभेने वाळू/रेती गटाच्या लिलावास सहमती दर्शविल्यास, त्या गावच्या वाळूगटाच्या सर्वोच्च बोलीच्या रकमेमधून वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम वजा करुन, उर्वरित रकमेपैकी खालीलप्रमाणे रक्कम ग्रामपंचायतीस देण्यात यावी :-

i) लिलावाची रक्कम रुपये १,००,००,०००/- पर्यंतच्या रकमेच्या २५% रक्कम.

ii) लिलावाची रक्कम रुपये १,००,००,००१/- ते रुपये २,००,००,०००/- पर्यंतच्या रकमेवर २०% रक्कम. तथापि, किमान रुपये २५,००,०००/-

iii) लिलावाची रक्कम रुपये २,००,००,००१/- ते रुपये ५,००,००,०००/- पर्यंतच्या रकमेवर १५% रक्कम. तथापि, किमान रुपये ४०,००,०००/-

iv) लिलावाची रक्कम रुपये ५,००,००,००१/- च्या वरीललिलावाच्या रकमेवर १०% रक्कम. तथापि, किमान रुपये ६०,००,०००/-

(५) (अ) ग्रामसभेने लिलावास ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यासच वरीलप्रमाणे रक्कम ग्रामपंचायतीस देय ठरेल.

(ब) लिलावधारकाने लिलावाची संपूर्ण रक्कम शासनजमा करुन वाळूगटाचा ताबा घेतल्यानंतर लिलावधारकाने विना अडथळा लिलावाच्या कालावधीत वाळूचे उत्खनन केल्यावर, लिलावाचा कालावधी संपल्यानंतर ग्रामपंचायतीस उक्त अ.क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणानुसार रक्कम देय होईल.

(क) ग्रामस्थांनी वाळू उत्खननास विरोध केल्यास किंवा ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार वाळू उत्खननास प्रशासकीय यंत्रणेकडून तसेच मा. न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आल्यामुळे लिलावधारकास वाळूचे उत्खनन करता आले नसल्यास व त्या कारणास्तव लिलावधारकास लिलावाची प्रमाणशिर रक्कम परत करावी लागल्यास लिलावधारकास परत करण्यात आलेल्या रकमेच्या प्रमाणात ग्रामपंचायतीस देय रक्कम कमी करण्यात येईल.

(६) ग्रामपंचायतीने वाळूच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी लिलावधारकामार्फत लिलावाच्या अटी व शर्तीप्रमाणे उत्खनन होत आहे किंवा कसे, याची पाहणी करणे व अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना त्यासंबंधीची माहिती देणे आवश्यक राहील.

(७) लिलावधारकाकडून वाहतुक करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहनासोबतच्या वाहतुक पासची तपासणी संबंधित गावच्या ग्रामसेवक व सरपंच यांना करता येईल. वाहनासोबत वाहतुक पास नसेल किंवा वाहतूक पासमध्ये खाडाखोड असेल, दिनांक व वेळ चूकीचा असेल अशा त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतची माहिती त्यांनी तहसिलदार यांना देणे आवश्यक राहील.

(८) ग्रामसभेने वाळू लिलाव करण्यास ना-हरकत न दिल्यास अशा वाळूगटाचे लिलाव करण्यात येणार नाहीत. मात्र अशा वाळूगटामधून वाळूचे उत्खनन होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील. सदर वाळूगटातून उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उत्खननास ग्रामपंचायतीने प्रतिबंध करुन, त्याबाबतची सविस्तर माहिती ( अर्थात उत्खनन करणाऱ्या व्यक्तीची नावे, वाहनांचे क्रमांक, उत्खननाची वेळी इत्यादी) संबंधित तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील. अवैध उत्खननाबाबत तहसिलदार, जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कारवाईस ग्रामपंचायतीने मदत करणे अनिवार्य राहील.

(९) वाळूगटाचा लिलाव करण्यास ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर वाळूगटाचा लिलाव करण्यात आला. मात्र असे वाळूगट लिलावात न गेल्यास शासनाच्या महसूलाचे नुकसान होऊ नये, तसेच ग्रामपंचायतीस सुध्दा निधी मिळावा याद्दष्टीकोनातून संबंधित ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार अशा वाळूगटासाठी निश्चित केलेल्या हातच्या किंमतीने जिल्हाधिकारी यांना परवाने देता येतील. ग्रामपंचायतीस सदर वाळू विकण्यास अनुमती राहील.

**४. राज्यशासनाच्या विविध विभागाच्या प्रकल्पांकरीता वाळूगट राखीव ठेवणे:-**

जिल्हाधिकारी यांनी राज्य शासनाच्या जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अधिक्षक अभियंता यांच्या लेखी मागणीनुसार त्यांच्या प्रकल्पासाठी योग्य त्या आकारमाणाचे वाळूगट राखीव ठेवावेत. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करणा-या यंत्रणेच्या लेखी मागणीनूसार प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधावयाच्या घरांच्या बांधकामासाठी देखील योग्य त्या आकारमानाचे वाळूगट राखीव ठेवावेत. असे वाळूगट राखीव ठेवण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्याकडे सर्वसाधारणपणे ऑगस्ट महिन्याअखेरपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील. जेव्हा केव्हा प्रकल्प उशीरा मंजूर झाल्यामुळे किंवा अन्य कारणांस्तव वाळूगट राखीव ठेवण्याची मागणी ऑगस्ट महिन्यानंतर करण्यात येईल, त्यावेळेस अशा प्रकल्पाकरीता लिलाव न झालेल्या उपलब्ध वाळूगटातून सुयोग्य वाळूगट राखीव ठेवण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. अशा प्रकल्पांसाठी वाळूगट राखीव ठेवताना संबंधित प्रकल्प यंत्रणेच्या प्रतिनिधींशी विचार-विनिमय करण्यात यावा. जेणेकरुन वाहतूकीचा खर्च कमी करता येईल व आवश्यक वाळूचे परिमाण निश्चित होईल. तद्नंतर अशा राखीव वाळूगटातून अशा प्रकल्पांसाठी आवश्यक वाळूच्या उत्खननाकरीता मागील

वर्षाच्या जिल्ह्याच्या सरासरी प्रतिब्रास लिलावाच्या किंमती प्रमाणे रक्कम वसूल करुन, उत्खनन परवाना व आवश्यक संख्येत वाहतूक परवाने जिल्हाधिका-यांनी द्यावेत.ज्या जिल्ह्यांमध्ये मागील वर्षी लिलाव यशस्वी झाला नसेल तर अशा ठिकाणी या धोरणाच्या आधारे सदर वाळूगटासाठी हातची किंमत निश्चित करुन त्याप्रमाणे रक्कम भरुन घेऊन उत्खनन परवाना व आवश्यक संख्येत वाहतूक परवाने जिल्हाधिकारी यांनी द्यावेत.

**५. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळासाठी वाळूगट राखीव ठेवणे :-**

१) जिल्हाधिकारी स्वेच्छेनुसार किंवा महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाच्या मागणीनुसार जिल्ह्यातील मोठे वाळूगट महामंडळामार्फत वाळूचे उत्खनन व विक्रीसाठी राखीव ठेवू शकतील.

२) सदर वाळूगटातून वाळू उत्खननाची कार्यवाही महामंडळ स्वत: किंवा ग्रामपंचायतीमार्फत करु शकेल.

३) महामंडळ अशा वाळूगटामधून उत्खनन केलेल्या वाळूची साठवणूक व विक्रीसाठी डेपो तयार करुन पुर्वनिर्धारीत किंमतीने वाळूची विक्री करेल. वाळूच्या विक्रीपासून प्राप्त रकमेमधून शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करावी लागेल व उर्वरित रक्कम महामंडळाचे उत्पन्न म्हणून राहील.

४) महामंडळास सदर वाळूगटांपैकी बारमाही पाणी असलेल्या वाळूगटांमधून पर्यावरण विभागाच्या मंजूरीच्या अधिन राहून यांत्रिक साधनांद्वारे (ड्रेझर्स) वाळूचे उत्खनन करता येईल.

५) महामंडळाकडून विक्री करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहतूकीसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून वाहतूक पास देण्यात येतील.

६) अशा प्रकरणांमध्ये उपरोक्त परिच्छेद क्रमांक ३ नुसार ग्रामपंचायतीस देय असणार निधी ग्रामपंचायतींना अनुज्ञेय राहणार नाही.

**६. वाळू/रेती उत्खननासाठी पर्यावरण अनुमती :-**

केन्द्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि. १४ सप्टेंबर २००६ (EIA Notification -२००६) व दिनांक १५.०१.२०१६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार गौण खनिज उत्खननापूर्वी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक आहे. पर्यावरण अनुमती घेण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(a) ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननापूर्वी जिल्हास्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती (District Level Expert Appraisal Committee) व जिल्हास्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (District Level Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्यासाठी जिल्ह्यातील वाळूगटाचे प्रस्ताव सर्वेक्षणानुसार फॉर्म-I मध्ये Project Proponent म्हणून जिल्हाधिकारी यांना योग्य वाटेल असा तहसिलदारांपेक्षा कमी दर्जाचा नाही अशा जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून समितीसमोर सादर करण्यात येईल.

(b) ५ ते ५० हेक्टर क्षेत्र असलेल्या वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननापूर्वी राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती (State Level Expert Appraisal Committee) व राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (State Level Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्यासाठी जिल्ह्यातील वाळूगटाचे प्रस्ताव सर्वेक्षणानुसार फॉर्म-I मध्ये Project Proponent म्हणून जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडून समितीसमोर सादर करण्यात यावेत.

(c) ५० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या वाळू/रेती गटांच्या उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

(d) पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(e) वाळू/रेतीगटातील उत्खननासाठी पर्यावरण विषयक अनुमतीकरीता केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १४/०९/२००६ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार Accredited Environment Consultant ची नेमणूक करण्यात येईल. यासाठी येणारा खर्च जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून पर्यावरणासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविता येईल.

सदर प्रस्ताव ज्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येतील, त्या बैठकीस Accredited Environment Consultant यांच्यासह जिल्हा खनिकर्म अधिकारी हे स्वत: उपस्थित राहतील.

(f) Project Proponent म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हास्तरीय समितींसमोर तसेच राज्यस्तरीय समितीसमोर पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावाने पर्यावरण अनुमती प्राप्त होईल. वाळूगटाचे लिलाव झाल्यानंतर संबंधित लिलावधारकाकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत असल्याने, पर्यायाने पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. त्यामुळे जे वाळू/रेतीगट लिलावात जातील त्यांच्या बाबतीत संबंधित लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव Project Proponent म्हणून पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रकरणपरत्वे जिल्हास्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरणासमोर किंवा राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरणासमोर तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(g) जिल्हास्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरणाने / राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरणाने पर्यावरण अनुमतीमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीचे लिलावधारकाकडून योग्यरित्या अनुपालन करण्यात येते किंवा कसे याबाबत वेळोवेळी पाहणी करण्याची जबाबदारी संबंधित तालुक्याचा तहसिलदार, संबंधित उप विभागीय अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांची राहील.

(h) जे लिलावधारक पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे उल्लंघन करतील त्यांच्या बाबतीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत करावयाच्या कारवाईखेरीज, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत कारवाई करण्यासंबंधीचा अहवाल, तहसिलदार यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यामार्फत दर सहा महिन्यांनी पर्यावरण विभागास सादर करावा.

(i) उप विभागीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांनी पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तींच्या अनुपालनाबाबतची पाहणी तसेच अटी व शर्तींचे उल्लंघन करणाऱ्या लिलावधारकाविरुध्द तहसिलदार यांच्याकडून योग्यरित्या कारवाई करण्यात येते किंवा कसे याबाबत वेळोवेळी तपासणी करावी.

**७. हातची किंमत (अपसेट प्राईसची) निश्चिती:-**

**अ) वाळू/रेतीच्या लिलावासाठी हातची किंमत निश्चित करण्याची कार्यपध्दती :-**

i) लिलावासाठी निश्चित करण्यात आलेल्या वाळूगटाचा गतवर्षी लिलाव झाला असल्यास गतवर्षीच्या लिलावामध्ये प्राप्त झालेली सर्वोच्च बोली व लिलावात मंजुर वाळूसाठा यानुसार प्रती ब्रास रक्कम परिगणीत करण्यात यावी. सदर प्रतिब्रास रकमेचा व यंदाच्या वर्षी निर्गतीसाठी अंदाजित केलेल्या वाळूसाठ्याचा गुणाकार केल्यानंतर येणारी रक्कम हातची किंमत म्हणून निश्चित करण्यात यावी.

ii) लिलावासाठी निश्चित करण्यात आलेल्या वाळूगटाचा गतवर्षी लिलाव झाला नसल्यास, जिल्हयात गतवर्षी लिलाव झालेल्या सर्व वाळूगटांच्या लिलावाची रक्कम व लिलावामध्ये मंजुर एकूण वाळूसाठा यानुसार प्रती ब्रास रक्कम परिगणीत करण्यात यावी व त्यात ६ टक्के दराने वाढ करण्यात यावी. सदर अद्यावत प्रतिब्रास रकमेचा व संबंधित वाळूगटातील अंदाजित वाळूसाठ्याचा गुणाकार केल्यानंतर येणारी रक्कम अशा वाळूगटाची हातची किंमत म्हणून निश्चित करण्यात यावी.

iii) लिलावासाठी निश्चित करण्यात आलेल्या वाळूगटाचा लिलाव झाला नसल्यास, तसेच जिल्ह्यात गतवर्षी लिलाव झाले नसल्यास, त्यापूर्वी ज्या वर्षी लिलाव झाले असेल, त्या वर्षाच्या लिलावाची रक्कम व लिलावामध्ये मंजूर वाळूसाठा यानुसार प्रती ब्रास रक्कम परिगणीत करण्यात यावी व त्यात चालू वर्षापर्यंत ६ टक्के प्रती वर्ष या दराने वाढ करण्यात यावी. सदर अद्यावत प्रतिब्रास रकमेचा व संबंधित वाळूगटातील अंदाजित वाळूसाठ्याचा गुणाकार केल्यानंतर येणारी रक्कम हातची किंमत म्हणून निश्चित करण्यात यावी.

**ब) हातपाटी व डुबीसाठी राखीव वाळू/रेती गटांसाठी :-**

(i) हातपाटी व डूबीसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या वाळू/रेतीगटासाठी हातची किंमत ठरविण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक वाळूगटामधील निर्गतीसाठी उपलब्ध असलेला वाळूसाठा विचारात घ्यावा.

(ii) गतवर्षी संबंधित वाळू गटामधील हातपाटी व डुबीद्वारे पारंपारिक पध्दतीने व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यावसायीकांना परवाना देताना आकारण्यात आलेला प्रती ब्रास दर व जिल्ह्यात वाळू लिलावात प्राप्त झालेला सरासरी प्रती ब्रास दर या दोन्हीं दराची सरासरी काढून हातपाटी व डूबीद्वारे वाळू उत्खननाचे परवाने देण्यासाठी संबंधित वाळूगटासाठी प्रतीब्रास रक्कम परिगणीत करण्यात यावी.

(iii) वरील क्रमांक (ii) मधील प्रतीब्रास रकमेमध्ये ६ टक्के वाढ करण्यात यावी व अशी वाढ केल्यानंतर येणारी प्रती ब्रास रक्कम व लिलाव वर्षी निर्गतीसाठी अंदाजित वाळूसाठा याचा गुणाकार करुन, येणारी रक्कम प्रतीब्रास वाळू/रेतीची किंमत म्हणून निश्चित करण्यात यावी.

(iv) हातपाटी व डुबीद्वारे वाळू उत्खननासाठी स्थानिक व्यक्तींना/संस्थांना परवाने देताना प्रतिब्रास सरासरी किंमत जास्त होत असल्याची संबधितांकडून मोठया प्रमाणावर तक्रारी आल्यास जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी त्याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावा, व त्यावर विभागीय आयुक्त यांनी यथोचित निर्णय घ्यावा.

**(क) एकापेक्षा जास्त जिल्ह्यातून/महसूल विभागातून वाहणाऱ्या एकाच नदीपात्रातील वाळू/रेती गटांबाबत:-**

जेव्हा एखादी नदी महसूल विभागातील एका पेक्षा जास्त जिल्ह्यातून किंवा दोन वेगवेगळया महसूली विभागातून वाहत असल्यास व त्या नदीच्या पात्रातील वाळू / रेती स्थळांचा दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांनी लिलाव करावयाचा असल्यास व असे जिल्हे वेगवेगळया विभागीय आयुक्तांच्या क्षेत्रात येत असल्यास अशा दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांनी आपापसात सल्लामसलत करुन एकच प्रतिब्रास हातची किंमत निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत या दोन्ही जिल्हयातील रेती / वाळू स्थळांच्या लिलावाची प्रतिब्रास हातची किंमत (अपसेट प्राईज) वेगवेगळी राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**८. <u>लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता:-</u>**

(अ) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक असणे आवश्यक राहील.

(ब) लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्तीं/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क वाळूगटाची हातची किंमत रू. १०.०० लाखापेक्षा कमी असल्यास रू. २,०००/- व रू. १०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास रू. ५,०००/- संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने धनादेशाद्वारे भरावी लागेल.

(क) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून अपसेट प्राईसच्या २५% रक्कम RTGS द्वारे भरावी लागेल.

**९. अ) वाळू/रेती लिलावाची कार्यपध्दती :-**

(१) वाळू/रेती लिलावाचा कमाल कालावधी एक वर्षाचा राहील व तो सर्वसाधारणपणे दिनांक १ ऑक्टोंबर ते पुढील वर्षाच्या ३० सप्टेंबर पर्यंत असेल. लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलावाचा कालावधी वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजीच संपुष्टात येईल. मात्र,

अ) ३००० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव, ३ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात यावेत.

ब) ३००० ते ४५०० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव, ४ १/२ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात यावेत.

क) ४५०१ ते ६००० ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव, ६ महिने किंवा ३० सप्टेंबर यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी करण्यात यावेत.

ड) ६००१ ब्रास व त्यावरील परिमाणाच्या वाळूगटाचे लिलाव दिनांक ३० सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीकरीता करण्यात यावेत.

तथापि अशा पध्दतीने लिलावाचा कालावधी निश्चित करत असतांना पाण्याखालील वाळूगटामध्ये दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही.याची स्पष्ट जाणीव लिलावात भाग घेणा-या सर्व संबंधितांना करुन देण्यात यावी.

२) वाळू/रेती गटाच्या लिलावाची जाहिरात जिल्ह्यातील दोन प्रमुख वर्तमानपत्रात लिलावापूर्वी किमान १५ दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात यावी. रु. १०.०० लाखापेक्षा जास्त हातची किंमत असलेल्या वाळूगटाची जाहिरात शक्यतोवर त्या महसूल विभागात अथवा राज्यस्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या दोन प्रमुख वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. त्याच्या प्रती सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सूचना फलकावर लावण्यात याव्यात. तसेच जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

३) वाळू/रेती गट लिलावाच्या जाहिरातीमध्ये लिलावाचा कालावधी, वाळू/रेती गटाचा सर्वे क्रमांक, वाळू/रेतीगट क्रमांक, वाळू/रेतीगटाचे नाव, वाळू/रेतीगटातील अंदाजित वाळू/रेतीसाठा व वाळू/रेती गटाची हातची किंमत (Upset Price), या बाबी ठळकपणे नमूद करण्यात याव्यात.

४) लिलावाच्या जाहिरातीमध्ये नमूद वाळू/ रेती स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे किंवा कसे, याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील. वाळू/रेती गटाचा ताबा घेऊन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही, या बाबीसुध्दा जाहिरातीमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात याव्यात.

(५) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्ती/संस्थेला निविदा सादर करताना इसारा रक्कम RTGS द्वारे भरावी लागेल.

(६) प्रस्तावित लिलावासंदर्भात काही तक्रारी / आक्षेप / सूचना प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी व संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत विभागीय आयुक्त यांनी त्याची तपासणी / चौकशी करावी व लिलाव न करण्यास सबळ कारणे असल्याची खात्री झाल्यास लिलावाची प्रक्रिया स्थगित करावी.

(७) विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये वाळू/रेती गटाचे लिलाव शक्यतो एकाच दिवशी करण्यासाठी खाली नमूद केल्यानुसार नियोजन करावे.

(अ) जिल्ह्यातील वाळू / रेतीच्या निर्गतीसाठी निश्चित केलेल्या सर्व वाळू/रेती गटांचा गटनिहाय लिलाव जिल्ह्याच्या मुख्यालयी एकाच दिवशी आयोजित करण्यात यावा.

(ब) लिलावाच्या दिवशी सर्व वाळूगटांच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास लगतच्या पुढील दिवशी सकाळी कार्यालयीन वेळेत कार्यवाही पुढे सुरु करावी.

(क) जिल्ह्यातील सर्व वाळूगटांचे लिलाव संबंधीत जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली पार पाडण्यात यावेत. जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

(ड) संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत संबंधीत विभागीय आयुक्त यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली पार पाडण्यात येतील. विभागीय आयुक्त यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

(८) वाळू/रेती गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या हातची किंमतीपेक्षा (upset price) अधिक रकमेने लिलावाच्या बोलीची सुरुवात करण्यात यावी.

(९) लिलावातील / निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांनी घ्यावयाचा असून, सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविणे आवश्यक राहील. निविदा नाकारावयाचा निर्णय घेतल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदविण्यात यावी.

(१०) लिलावात भाग घेणाऱ्या ज्या व्यक्तीचा देकार / निविदा स्वीकारण्यात आली नसेल, त्यांनी लिलावात भाग घेण्यासाठी भरलेली इसारा रक्कम (EMD) लिलावाची कार्यवाही संपताच परत करण्यात यावी.

(११) ज्या लिलावधारकाच्या सर्वोच्च बोलीचा देकार/निविदा स्वीकारण्यात येईल त्याला, सर्वेक्षण शुल्कापोटी रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेचा धनादेश उपसंचालक किंवा वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या नावाने जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

(१२) सर्वोच्च बोलीचा देकार /निविदा स्विकारण्यात आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या १/४ इतकी रक्कम लिलावाच्याच दिवशी प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात भरावी लागेल. लिलावापूर्वी शासनजमा केलेली इसारा रक्कम ही सदर लिलावाच्या बोलीच्या १/४ रकमेत समायोजित करण्यात येईल. तसेच, उर्वरित ३/४ रक्कम लिलावाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात भरावी लागेल. लिलावधारकाने लिलावाच्या बोलीच्या ३/४ रक्कम लिलावाच्या दिनांकापासून १५

दिवसात भरणार असल्याचे हमीपत्र रू. १००/- च्या मुद्रांकनावर सादर करणे आवश्यक राहील.

अपवादात्मक परिस्थितीत लिलावाच्या बोलीच्या ३/४ रक्कम भरण्याची मुदत आणखी १५ दिवसापर्यंत वाढविण्याचे अधिकार, त्यासंबंधीची कारणे नोंदवून, जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थितीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या सदर रकमेवर १५ टक्के वार्षिक दराने व्याज भरावे लागेल.

(१३) यशस्वी लिलावधारकासोबत वाळू/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे लिलावाची रक्कम रु. १० लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या रकमेच्या ०.१ टक्का किंवा रु. १००/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुल्क व लिलावाची रक्कम रु. १० लाखपेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रकमेवर ०.२ टक्के मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधित लिलावधारकाने भरणे आवश्यक राहील.

(१४) लिलावधारकाने/परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ हातच्या किंमतीच्या २०% एवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांच्याकडे ठेवणे आवश्यक राहील. ही रक्कम लिलावधारकाने/परवानाधारकाने लिलावाच्या/परवान्याच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, लिलावाची/परवान्याची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

(१५) लिलावधारक/परवानाधारकाने जिल्हा परिषद / पंचायत समिती तसेच शासनाने विहित केलेले कर/शुल्क व जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरिता शासन वेळोवेळी निश्चित करील एवढी अंशदानाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

(१६) करारनामा केल्यानंतर लिलावधारकास वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात यावा. वाळू/रेती स्थळाचा ताबा लिलावधारकास सात दिवसात न दिल्यास त्यास जबाबदार असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

(१७) लिलावधारकास वाळूगटाचा ताबा देताना तसेच ताबा परत घेताना तहसिलदार किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या समक्ष पंचनामा करण्यात यावा. वाळूगटात खड्डे असल्यास त्याचा उल्लेख पंचनाम्यामध्ये करावा. याबाबतचे व्हिडीओ चित्रीकरणही करण्यात यावे.

**ब) हातपाटी व डुबीसाठी राखीव गटातुन परवाना देण्याची कार्यपध्दती** :-

(अ) " विनालिलाव परवाना पध्दतीने डूबी / हातपाटीद्वारे नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट" यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तींच्या संस्थांना वाळू/रेती उत्खननाचे परवाने देण्याच्या दृष्टीने संबधित जिल्हाधिकारी/अपर

जिल्हाधिकारी यांनी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. प्राप्त अर्जांची छाननी करुन, पात्र स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तींच्या पात्र संस्थांना डूबी किंवा हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खननाचे परवाने जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन देण्यात यावेत.

(ब) " विनालिलाव परवाना पध्दतीने डूबी/हातपाटीद्वारे नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट " यामधून वाळू उत्खननासाठी पारंपारिक साधनांचाच वापर अनुज्ञेय असेल. अशा गटात कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही यांत्रिक साधनाचा वापर होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**१०. वाळू/रेती गटाचे फेरलिलाव व फेरलिलावातही वाळू/रेती गटाचा लिलाव न झाल्यास करावयाची कार्यपध्दती:-**

**अ)** (१) लिलावधारकाने देकाराची उर्वरित ३/४ रक्कम विहित कालावधीत न भरल्यास तसेच विहित कालावधीत करारनामा करुन न दिल्यास त्याला वाळू/रेती गटाचा ताबा देण्यात येणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली १/४ रक्कम जप्त करण्यात यावी व अशा वाळू/रेती गटाचा फेरलिलाव करण्यात यावा.

(२) कोणत्याही कारणास्तव वाळू /रेती लिलाव रद्द करण्यात आल्यास अशा वाळू/रेतीगटाचा नव्याने लिलाव करण्यात यावा.

(३) फेरलिलाव किंवा नव्याने लिलाव केल्यास पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात यावी. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

**ब)** (i) लिलावात ठेवण्यात आलेल्या एखाद्या वाळू/रेती गटाकरिता हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईसपेक्षा) कमी देकार प्राप्त झाल्यास किंवा देकार प्राप्त न झाल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदवून त्या वाळू/रेती गटाचा दोनदा फेरलिलाव करण्यात यावा.

(ii) दोनदा फेरलिलाव करुनही, अशा वाळू/रेतीगटासाठी हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईसपेक्षा) जास्त देकार प्राप्त न झाल्यास किंवा देकार प्राप्त न झाल्यास त्याची सर्वसाधारण कारणे नोंदविण्यात यावी. अशा वाळू/ रेती गटाची हातची किंमत मुळ हातच्या किंमतीपेक्षा जास्तीत जास्त २५ % पर्यंत कमी करुन त्या वाळू/रेतीगटाचा फेरलिलाव करण्यास विभागीय आयुक्तांची अनुमती घेण्यात यावी. ही प्रक्रिया १५ दिवसाच्या कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी.

(iii) (अ) वरीलप्रमाणे कार्यवाही करुनही जे वाळूगट लिलावात जाणार नाहीत यापैकी कोणतेही वाळूगट महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळासाठी राखीव ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(ब) सदर वाळूगटातून वाळू उत्खननाची कार्यवाही महामंडळ स्वत: किंवा ग्रामपंचायतीमार्फत करु शकेल.

(क) अशा वाळूगटामधून उत्खनन केलेल्या वाळूची साठवणूक व विक्रीसाठी डेपो तयार करुन पुर्वनिर्धारीत किंमतीने वाळूची विक्री महामंडळाकडून करण्यात येईल. वाळूच्या विक्रीपासून प्राप्त रकमेमधून शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करावी लागेल व उर्वरित रक्कम महामंडळाचे उत्पन्न राहील.

(ड) महामंडळास सदर वाळूगटांपैकी बारमाही पाणी असलेल्या वाळूगटांमधून पर्यावरण विभागाच्या मंजूरीच्या अधिन राहून यांत्रिक साधनांद्वारे (ड्रेझर्स) वाळूचे उत्खनन करता येईल.

(इ) महामंडळाकडून विक्री करण्यात येणाऱ्या वाळूच्या वाहतूकीसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून वाहतूक पास देण्यात येतील.

(ई) अशा प्रकरणांमध्ये उपरोक्त परिच्छेद क्रमांक ३ नुसार ग्रामपंचायतीस देय निधी ग्रामपंचायतींना अनुज्ञेय राहणार नाही.

(iv) शासनाच्या महसूलाचे नुकसान होवू नये यासाठी, जप्त वाळू/रेती साठ्याच्या लिलावाबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यावरही जे वाळूसाठे लिलावात जाणार नाहीत, असे वाळूसाठे जिल्ह्यातील संबंधित शासकीय कामांच्या अंदाजपत्रकात नमूद केलेली वाळूची किंमत किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या किंमतीनुसार अशा शासकीय कामांसाठी उपलब्ध करुन देण्याकामी परवाने मंजूर करण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना राहील.

## ११. वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी/शर्ती :-

**(१)** वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती पुढीलप्रमाणे राहतील व त्यांचा समावेश संबंधित लिलावधारक/परवानाधारकासोबत करावयाच्या करारपत्रात न चूकता करणे अनिवार्य असेल :-

(i) लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहीत केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

(ii) माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र. १९६२८-१६२९/२००९ मध्ये दि. २७/०२/२०१२ रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेती गटातून जास्तीत जास्त ३ मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत किंवा पर्यावरण अनुमतीमध्ये

परवानगी दिलेल्या खोलीपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढ्या खोलीपर्यंतच लिलावधारक/ परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

(iii) नदीपात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

(iv) लिलावधारकास लिलावात मंजूर केलेल्या वाळूसाठ्याइतकेच उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

(v) वाळू/रेतीचे उत्खनन व वाहतूक सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधीव्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन व वाहतूक अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

(vi) कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पूलाच्या कोणत्याही बाजुने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(vii) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

(viii) सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

(ix) खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, वाळू / रेती काढता येणार नाही तसेच रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/ रेती काढता येणार नाही.

(x) लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवूण विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवड्याला तहसिलदार यांना सादर करावे.

(xi) वाळु उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसुल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजुबाजुच्या परिसरात पुरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजूर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वाळू/रेतीचे उत्खनन सुरू करणे आवश्यक राहील.

(xii) या व्यतिरिक्त वाळू/रेती उत्खननासंदर्भात इतर अटी व शर्ती विवरणपत्रात देण्यात आल्या असून, त्या लिलावधारकांवर बंधनकारक असतील.

**(२)** अवैध उत्खनन अधिक प्रभावीपणे रोखण्याच्या दृष्टीने शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा अतिरिक्त उपाययोजनांच्या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यात तत्संबंधी अटी व शर्तींचा समावेश करु शकतील.

**१२. वाळू / रेती उत्खननासाठी वापरावयाची साधनेः-**

नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.

**१३. लिलाव/परवानाधारकाने अटी/शर्तींचे उल्लंघन केल्यास करावयाची कारवाईः-**

(अ) लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावून सुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळू घाटाचा लिलाव होऊ शकत नाही. अशा प्रकारे संगनमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसारखे गुन्हे करणाऱ्या लिलावधारकास संपुर्ण राज्यासाठी काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.

(ब) पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात यावा. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

(क) वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतुक पास आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्यात यावी. याबाबतच्या निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतुक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

(ड) अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये संबंधित ठेकेदार / लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधि संहीता कलम, ३४,११४,३७९,३९२,३९३,३९४,३९६ इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम ४८(८) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळु जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात यावी.

(इ) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणात वाळूच्या बाजारभावाच्या आधारे दंडाची आकारणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील वाळूच्या बाजारभावाची सरासरी काढून दरवर्षी दिनांक १ जानेवारी रोजी वाळूचे बाजारभाव निश्चित करावे व त्यानुसार दंडाच्या रकमेची

परिगणना करावी. प्रकरणपरत्वे दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना नोटीस देवून त्यांची बाजू ऐकून घेऊन कायद्यातील तरतुदीनुसार स्वयंस्पष्ट आदेश पारित करण्यात यावेत.

तसेच वाळूचे अवैध उत्खनन/ वाहतुकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ अधिनियमान्वये कारवाई करण्यात यावी.

(ई) लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनूसार कारवाईस पात्र राहतील.

(उ) वाळू/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकीबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यास पात्र राहील.

**१४. प्रतिबंधात्मक उपाययोजना** :-

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक होणार नाही यासाठी संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) प्रत्येक वाळूगटांमधील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा.

२) जिल्हाधिकारी यांनी वाळूगट असलेल्या भागातील मोक्याच्या ठिकाणी चेकनाके निश्चित करावे. अशा निश्चित केलेल्या चेकनाक्यावर शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून निधी उपलब्ध करुन वजनकाटा बसविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

३) (अ)प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी २४/७ छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतुकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना सोसणे आवश्यक राहील. तसेच लिलाव न झालेल्या वाळूगटातील वाळूची अवैध वाहतुक होवू नये यासाठी ज्या ठिकाणाहून वाहतूक होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व यासाठी जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(ब) लिलावधारकांनी बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतुकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर १५ दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.

(क) तहसिलदारांनी सदर सीडी मधील छायाचित्रण आपल्या अधिनस्त यंत्रणेमार्फत तपासून घ्यावे. संबंधित तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांनी अधूनमधून स्वत: देखील अशा छायाचित्रणाची तपासणी करावी. अशा तपासणीत सी.सी.टी.व्ही. कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास, मंजूर वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन, जेवढे दिवस सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस सरासरी उत्खनन केले, असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रतीब्रास रक्कम परिगणीत करुन त्या दराने सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रक्कमे एवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करण्यात यावी. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी सी.सी.टी.व्ही बंद असला, तरीही पूर्ण दिवसासाठी सी.सी.टी.व्ही. बंद असल्याचे समजून वरील प्रमाणे दंडात्मक रकमेची आकारणी व वसूली करण्यात यावी.

४) प्रत्येक गाव कामगार तलाठयाने त्याच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटास नियमितपणे भेट देणे आवश्यक राहील. त्यासाठी संबंधित लिलावधारकाकडे तहसिलदारांनी प्रमाणित करून दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल. तलाठयाने वाळूगटास भेट दिल्यानंतर दैनंदिन भेट वहीमध्ये त्याची नोंद करुन दिनांकित स्वाक्षरी करावी.

५) संबंधित मंडळ अधिकाऱ्यानेही नियमितपणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटाची पाहणी करून, त्याची नोंद उक्त दैनंदिन भेट वहीमध्ये करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

६) संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील वाळूगटाला वेळोवेळी आकस्मिक भेट देऊन त्याची दैनंदिन भेटवहीत नोंद करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

७) ज्या वाळू गटांबाबत विधानमंडळात तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना व अन्य कोणत्याही मार्गाने गंभीर तक्रार उपस्थित झाली असेल अशा सर्व प्रकरणात अपर जिल्हाधिकारी यांनी व्यक्तीश: स्थळ पाहणी करून शासनास अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.

८) वरील अधिकाऱ्यांनी रेतीगटाची तपासणी करताना खालील बाबी कटाक्षाने पहाव्यात :-

(अ) उत्खननास प्रारंभ केल्यापासून तपासणीच्या दिनांकापर्यंत उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व तपासणीच्या दिवसापर्यंत उत्खननाच्या ठिकाणी असलेला वाळूसाठा.

(ब) संबंधित तलाठी व ग्रामसेवक तसेच संबंधित लिलावधारक यांच्यासमक्ष दरमहा वाळूगटामधील उत्खननाची मोजणी करण्यात यावी.

(क) नदीपात्रात पूल असल्यास त्या पुलाच्या आजूबाजूस तसेच बेंच मार्कच्या आजूबाजूस व बेंच मार्कच्या खाली वाळू उत्खनन केले जात आहे किंवा कसे याची पहाणी करण्यात यावी व त्याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

(ड) नदीच्या काठाजवळच्या लगतच्या भागामध्ये उत्खनन केले जाते आहे किंवा कसे, व त्याकरिता पोकलेन/ जेसीबी यांसारख्या यांत्रिक साधनांचा वापर करण्यात आला आहे किंवा कसे,

(इ) उत्खनन केलेला वाळू साठा विहीत अंतरापर्यंत करण्यात आलेला आहे किंवा कसे,

९) जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणीची वरील मानके काटेकोरपणे पाळली जात आहेत किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी. तपासणीनंतरही एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात अवैध वाळू उत्खनन/ वाहतूक अव्याहतपणे होत असल्याचे निष्पन्न झाल्यास, संबंधित अधिकाऱ्याचे अवैध उत्खनन/वाहतूक करणाऱ्या व्यक्तींशी संगनमत आहे असे गृहीत धरुन संबंधिताविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्यात यावा.

**१५. सनियंत्रण:-**

(अ) वाळू वाहतूकीसाठी केन्द्र शासनाच्या दिनांक १५.०१.२०१६ च्या अधिसूचनेतील परिशिष्ट १२ मधील सनियंत्रण प्रकियेचा वापर करणे अनिवार्य राहील. तसेच वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस प्रभावीपणे आळा घालण्याच्या दृष्टीने उक्त सनियंत्रण प्रकियेबरोबरच शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा प्रणालीचा वापर करण्याची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना मुभा राहील.

(ब) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी तहसिल, उप विभाग, जिल्हा स्तरावर व विभागीय स्तरावर पोलीस, परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी व महसूल अधिकारी / कर्मचारी यांची स्वतंत्र भरारी / दक्षता पथके अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी निर्माण करावी. सदर पथकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवैध उत्खनन व वाहतूकीस अटकाव करणे ही या पथकाची सामुहीक जबाबदारी राहील.

(क) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन /वाहतूकीची घटना वा प्रकरण ज्या महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्रात उघडकीस येईल, ते अधिकारी / कर्मचारी सदर प्रकरणात जबाबदार आहेत काय याची कसून तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये संबंधित स्थानिक अधिकारी / कर्मचारी अवैध उत्खननाकडे हेतुत: दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले किंवा त्यांनी अवैध उत्खनन / वाहतूकीवर पुरेसे नियंत्रण न ठेवल्याचे आढळल्यास त्या अधिकारी /

कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन, त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

(ड) वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन/वाहतूकीसंबंधीच्या तक्रारी/निनावी तक्रारी online करण्यासाठी प्रणाली तयार करण्यात यावी. सदर प्रणालीत तक्रारीस/ निनावी तक्रारीस online तक्रार क्रमांक देण्याबाबत तरतुद असावी. वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन/वाहतूकीच्या तक्रारी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी Toll Free Number उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन/वाहतुकीच्या तक्रारी/ निनावी तक्रारीं संदर्भात प्रत्येक जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार कार्यालयांनी नोंदवही ठेवावी. सदर नोंदवहीत तक्रारीबाबत संपूर्ण माहिती व सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती ठेवण्यात यावी. तसेच सदर तक्रारी/निनावी तक्रारीबाबतची माहिती ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात यावी.

**१६. उत्खननाबद्दल मासिक अहवालः-**

प्रत्येक जिल्हयामध्ये एकूण वाळूघाट किती आहेत, त्यापैकी किती वाळूघाटांचा लिलाव झाला, किती वाळूघाटांचा लिलाव झाला नाही, या लिलावात शासनास किती महसूल प्राप्त झाला, प्रत्येक वाळूघाटातून दर महिन्याला किती ब्रास वाळू उत्खनन करण्यात आली, तसेच जिल्हयामध्ये अवैध उत्खननाची किती प्रकरणे प्रत्येक महिन्याला उघडकीस आली व किती प्रकरणात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले, याबाबतचे मासिक विवरणपत्र अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांनी शासनास व संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांना सादर करावे.

**१७. अ) <u>दक्षता समित्या-</u>**

(१) शासन निर्णय क्रमांक गौखनि १०/०४११/प्र.क्र. २८५/ख, दि. २७/०१/२०१२ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या तक्रारीच्या पडताळणीसाठी शासन स्तरावर दक्षता व निरीक्षण पथक निर्माण करण्यात आले आहे. सदर दक्षता व निरीक्षण पथक पुढीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| सह/उप सचिव - ख कार्यासन | - | पथक प्रमुख |
| अवर सचिव/कक्ष अधिकारी - ख कार्यासन | - | सदस्य |
| सहायक कक्ष अधिकारी - ख कार्यासन | - | सदस्य |
| संबंधित जिल्हा खनिकर्म अधिकारी | - | सदस्य |
| संबंधित जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख | - | सदस्य |

सदर दक्षता व निरीक्षण पथकांकडून करण्यात येणाऱ्या तपासणी दरम्यान वाळूचे अवैध उत्खनन, वाहतूक व वाळूसाठे आढळून आल्यास, उत्खननासाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री, वाहतुकीची साधने व वाळूसाठे जप्त करुन, ते संबंधित तहसिलदार यांच्या ताब्यात देण्यात यावे.

संबंधित तहसिलदार यांनी सदर वाळूसाठ्याच्या व यंत्रसामग्रीच्या विल्हेवाटीबाबत नियमानुसार विहीत कार्यपध्दती अनुसरुन तात्काळ कार्यवाही करावी.

(२) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय दक्षता समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

(१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष,
(२) पोलीस आयुक्त - सदस्य,
(३) पोलीस अधिक्षक - सदस्य,
(४) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारीअधिकारी - सदस्य,
(५) अपर जिल्हाधिकारी - सदस्य,
(६) प्रादेशिक परिवहन अधिकारी - सदस्य,
(७) जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख - सदस्य,
(८) जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

(३) उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या दक्षता समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

(१) उप विभागीय अधिकारी - अध्यक्ष
(२) उपविभागीय पोलीस अधिकारी - सदस्य
(३) संबंधित तहसिलदार - सदस्य
(४) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा प्रतिनिधी - सदस्य
(५) उप विभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित तहसिलदार - सदस्य सचिव

(४) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या दक्षता समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

(१) तहसिलदार - अध्यक्ष,
(२) उप अधिक्षक भूमि अभिलेख - सदस्य
(३) गट विकास अधिकारी - सदस्य
(४) पोलीस निरीक्षक - सदस्य
(५) नायब तहसिलदार (महसूल) - सदस्य सचिव

(५) ज्या गावात वाळूसाठे असतील अशा गावात ग्राम दक्षता समिती स्थापन करण्यात यावी. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असावी :-

(१) ग्रामपंचायतीचे सरपंच - अध्यक्ष
(२) ग्राम सेवक - सदस्य
(३) पोलीस पाटील - सदस्य
(४) कोतवाल - सदस्य
(५) तलाठी - सदस्य सचिव

**ब) दक्षता समितीचे कामकाज :-**

(१) जिल्हाधिकाऱ्यांनी सदर समितीची दर महिन्यात एकदा बैठक घेऊन आधीच्या महिन्यात वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत दक्षता समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा. तसेच अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना संदर्भातील सूचना संबंधितांना द्याव्यात. जिल्हास्तरीय दक्षता समितीने वरील बाबीखेरीज पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(अ) वाळूच्या अवैध वाहतूकीसाठी ट्रॅक्टर वापरल्यास प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी त्याची नोंदणी रद्द करावी.

(ब) वाळूच्या अवैध वाहतूकीसाठी वापरण्यात आलेल्या इतर वाहनांचे उदा. ट्रक, टेम्पो, यांसारख्या वाहनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने ( Regional Transport Authority) अशा वाहनांचा परवाना किमान एक वर्षासाठी निलंबित करावा. अशा निलंबित करण्यात आलेल्या वाहनांवर बनावट नंबर प्लेट लावून त्या वाहनांचा वापर वाहतूकीसाठी होणार नाही, याची ही खबरदारी घ्यावी.

(क) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे नोंदणी न झालेल्या होड्या वाळू/रेती वाहतूकीसाठी वापरल्यास त्या जप्त करुन, अशा होड्यांचा लिलाव करण्यात यावा .

(ड) वाळू/रेतीच्या अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली साधने जप्त केल्यानंतर त्याच्या मालकांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेतल्यानंतर अशी वाहने पुन्हा अवैध वाहतूकीसाठी वापरण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास, सदर बंधपत्र रद्द करून त्याची रक्कम शासन जमा करण्यात यावी व अशा वाहनाचा परवाना किमान ६ महिने निलंबीत करण्यात यावा.

(२) उप विभागीय अधिकाऱ्यांनी व तहसिलदारांनी त्यांच्या अध्यक्षतेखालील दक्षता समितीची बैठक दरमहा घ्यावी व वर स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(३) ग्रामदक्षता समितीची दर पंधरा दिवसांनी एक बैठक घेणे आवश्यक असेल, वाळू/रेतीचे अवैध उत्खनन होत असल्यास त्याला आळा घालण्यासाठी ग्रामदक्षता समितीच्या काही शिफारशी असल्यास त्या संबंधित तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात याव्यात.

**१८. जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमधून संबंधित ग्रामपंचायतीसाठी निधी:-**

केंद्र शासनाने खाण व खनिजे (विकास व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (ब) मध्ये राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ ०६१५/५१/प्र.क्र.३४/उदयोग-९, दिनांक १.०९.२०१६ अन्वये, जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करुन, सर्व प्रकारच्या गौण खनिज खाणपट्टाधारक, परवानाधारक तसेच वाळू लिलावधारकाकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्वधनाच्या व लिलावाच्या रकमेच्या १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी अंशदान म्हणून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायती क्षेत्रातील रस्ते, आरोग्य, इत्यादी साठी निधी देय आहे.

शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ ०६१५/ ५१/ प्र.क्र.३४/उदयोग-९, दिनांक १.०९.२०१६ अन्वये, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमध्ये जमा होणा-या रकमेच्या पाच टक्केपेक्षा जास्त नाही अशी रक्कम प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्यासाठी खर्च करता येते. सदर मर्यादेच्या अधिन राहून उक्त निधीतून खालील बाबींकरीता गरजेनुसार खर्च करता येऊ शकेल:-

१. अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना करणे.
२. जप्त केलेले वाहन बंद स्थितीत असल्यास सदर वाहन सुरक्षित स्थळी हलविण्यासाठीच्या उपाययोजना करणे.
३. जप्त केलेल्या वाळूसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी सुरक्षा रक्षक नियुक्त करणे.
४. दक्षता व निरीक्षण पथकासाठी खाजगी वाहने भाड्याने घेणे.

**१९. वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात जिल्हास्तरीय समिती :-**

लिलाव झालेल्या वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननासाठी लिलावधारकास येणाऱ्या अडचणी व विविध व्यक्ती व संस्थांकडून वाळू उत्खननाबाबत करण्यात येणाऱ्या तक्रारीसंदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिका-यांचा समावेश असलेली समिती राहील.

| | | |
|---|---|---|
| (१) अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| (२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| (३) सार्वजनिक बांधकाम विभागाचा जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता | - | सदस्य |
| (४) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचा जिल्ह्यातील किंवा यथास्थिती विभागातील वरीष्ठ अधिकारी | - | सदस्य |
| (५) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा जिल्हास्तरीय अधिकारी | - | सदस्य |
| (६) जिल्हा खनिकर्म अधिकारी | - | सदस्य सचिव |

(अ) एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळू उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी / अडथळे आल्यास, त्यांनी याबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडे अर्ज सादर करावा. संबंधित तहसिलदार यांनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या वाळू गटातून उत्खनन करण्यास येणा-या अडचणींची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

(ब) तसेच रेती / वाळू स्थळातून लिलावांच्या अटी /शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते, अवैध / नियमबाह्य वाळू उत्खननामुळे नदी काठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो, वाळूच्या वाहतूकीमुळे नदी काठच्या शेतीची/ रस्त्यांची हानी होते, अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून प्राप्त झाल्यास, अशा तक्रारीची तहसिलदार यांनी चौकशी करुन

त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

(क) लिलावधारकास वाळू उत्खनन करण्यास होणाऱ्या स्थानिक विरोधामुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील व नैसर्गिक सबळ कारणामुळे वाळूचे उत्खनन करता येत नसल्यास लिलावधारकाने त्वरीत जिल्हास्तरीय समितीसमोर अर्ज करावा. याप्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यास, सदर समितीने अशा वाळू / रेती स्थळाना प्रत्यक्ष भेट देऊन, त्या वाळू/रेती स्थळाचे पुनश्च: सर्वेक्षण करावे, तसेच तक्रारीतील अन्य मुद्यांबाबत स्थानिक चौकशी करावी व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन, संबंधीत वाळू /रेती गटातून वाळूचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत १५ दिवसांत उचित निर्णय घ्यावा व तो निर्णय संबंधीत लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रिय महसूल अधिका-यांना कळवावा. जिल्हास्तरीय समितीने वाळूगटाच्या सर्वेक्षणाच्यावेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्याची दक्षता घ्यावी.

(ड) ज्या तक्रारदाराला त्याच्या तक्रारीच्या संदर्भात समितीने घेतलेला निर्णय मान्य नसेल, अशा तक्रारदाराला त्याबाबत संबंधीत विभागीय आयुक्तांकडे अपिल करता येईल. संबंधीत विभागीय आयुक्त जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसात उचित निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधित तक्रारदार व संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल.

(इ) वरीलप्रमाणे वाळू उत्खननासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर समितीने चौकशी करुन, ज्या वाळूगटातील वाळूचे उत्खनन बंद करण्याविषयी निर्णय घेतला असेल, अशावेळी लिलावधारकासोबत करण्यात आलेला करारनामा तात्काळ रद्द करण्यात यावा. तसेच संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम अथवा यथास्थिती उत्खनन न करता आलेल्या वाळूची रक्कम परत करण्याबाबत सदर शासन निर्णयातील परिच्छेद २१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ई) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू/ रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

**२०. अवैध उत्खनन व वाहतुक कारवाईत जप्त वाळू/रेती साठयाच्या विल्हेवाटीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती:-**

(१) जप्त केलेल्या वाळूसाठा चोरी होऊ नये, पावसाच्या पाण्यामुळे वाळू वाहून जाऊ नये, धूप होऊन वाळूसाठा कमी होऊ नये, याद्दष्टीकोनातून जप्त केलेल्या वाळूगटाचा लिलाव एक महिन्याच्या आत करण्यात यावा.

(२) जिल्ह्यात लिलावात गेलेल्या वाळू/रेतीच्या सरासरी प्रतीब्रास किंमतीनुसार जप्त केलेल्या वाळू/रेतीसाठयाची हातची किंमत निश्चित करण्यात यावी. (लिलाव झाले नसल्यास मागील वर्षाच्या लिलावात गेलेल्या वाळू/रेतीच्या सरासरी प्रतीब्रास किंमतीनुसार हातची किंमत निश्चित करण्यात यावी)

(३) निश्चित केलेल्या हातच्या किंमतीनुसार जप्त केलेल्या वाळूसाठ्याचा लिलाव उपविभागीय अधिकारी यांनी करावा.

(४) (i) लिलावात ठेवण्यात आलेल्या जप्त वाळूसाठ्याकरिता हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईसपेक्षा) कमी देकार प्राप्त झाल्यास किंवा देकार प्राप्त न झाल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदवून त्या वाळू/रेती साठ्याचा दोनदा फेरलिलाव करण्यात यावा.

(ii) दोनदा फेरलिलाव करुनही, अशा वाळू/रेती साठ्यासाठी हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईसपेक्षा) जास्त देकार प्राप्त न झाल्यास किंवा देकार प्राप्त न झाल्यास त्याची सर्वसाधारण कारणे नोंदविण्यात यावी. अशा वाळू/ रेती साठ्याची हातची किंमत मुळ हातच्या किंमतीपेक्षा जास्तीत जास्त २५ % पर्यंत कमी करुन त्या वाळू/रेतीसाठ्याचा फेरलिलाव करण्यास विभागीय आयुक्तांची अनुमती घेण्यात यावी. ही प्रक्रिया १५ दिवसाच्या कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी.

(iii) शासनाच्या महसूलाचे नुकसान होवू नये यासाठी, जप्त वाळू/रेती साठ्याच्या लिलावाबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यावरही जे वाळूसाठे लिलावात जाणार नाहीत, असे वाळूसाठे जिल्ह्यातील संबंधित शासकीय कामांच्या अंदाजपत्रकात नमूद केलेली वाळूची किंमत किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या किंमतीनुसार अशा शासकीय कामांसाठी उपलब्ध करुन देण्याकामी परवाने मंजूर करण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना राहील.

(५) वाळूसाठ्याच्या जप्तीविरुध्द सक्षम न्यायालयात दावा दाखल करण्यात आला असल्यास सक्षम न्यायालयाच्या परवानगीने वाळूसाठ्याचा लिलाव करण्यात यावा. सदर प्रकरणावरील अंतीम निर्णय झाल्यानंतर लिलावापासून प्राप्त रक्कम शासनाच्या विहित लेखाशिर्षात जमा करण्यात यावी अथवा संबंधित व्यक्तीस परत करण्यात यावी.

## २१. लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधी कार्यपध्दती :-

### १) लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधीची कारणे व अधिकार

(अ) वाळूगटाचा यशस्वीरित्या लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाने लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्यानंतर संबंधित लिलावधारक यांना काही अपरिहार्य कारणास्तव वाळूगटाचा **<u>ताबा देणे शक्य झाला नसेल/ होत नसेल</u>** अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने गरज असल्यास स्थळ पहाणी करुन, वाळूगटाचा ताबा देणे शक्य नाही, असा अहवाल शिफारशीसह शासनास सादर केल्यास लिलावाची संपूर्ण रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(ब) लिलावधारक यांनी लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्या असतील आणि कोणत्याही न्यायालयीन आदेशाने किंवा शासनाच्या तसेच वरीष्ठ प्राधिकरणाच्या आदेशाने वाळू उत्खननास स्थगिती देण्यात आली असेल, अशा प्रकरणांत

ज्या कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली आहे, त्या कालावधीच्या प्रमाणात लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(क) अन्य कोणत्याही कारणास्तव वाळू उत्खनन करणे शक्य झाले नसेल/होत नसेल (उदा. ग्रामस्थांचा विरोध, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध) अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन, लिलावधारक तसेच ग्रामस्थांनी दिलेल्या कारणांची खातरजमा करुन, संबंधित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करणे शक्य आहे किंवा कसे, याबाबत सुस्पष्ट शिफारशीसह अभिप्राय जिल्हाधिकारी यांना सादर करावेत. जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीने वाळू उत्खनन न करता येण्याबाबत दिलेल्या कारणांची तपासणी करुन, सदर कारणे समर्पक असल्यास लिलावस्थळाचा ताबा परत घ्यावा व संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम/प्रमाणशीर रक्कम परत करण्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शिफारशीसह विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

**२) लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याकामी परिगणना :-**

(अ) लिलावाची देकाराची रक्कम व लिलावातील अंदाजीत वाळूसाठा यानुसार वाळूची प्रतीब्रास किंमत परिगणीत करण्यात यावी.

(ब) लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध कालावधी यानुसार दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण निश्चित करण्यात यावे. लिलावधारकास ज्या कालावधीसाठी वाळू उत्खनन स्थगित/बंद ठेवावे लागले तो कालावधी व दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण यानुसार स्थगित/बंद कालावधीमध्ये उत्खनन करता येऊ न शकलेला वाळूसाठा निश्चित करण्यात यावा.

(क) वरील क्रमांक (ब) नुसार निश्चित केलेला वाळूसाठा व प्रत्यक्षात उत्खनन न करता आलेला वाळूसाठा यापैकी जो कमी असेल, तेवढ्या वाळूसाठी वरील क्रमांक (अ) येथील प्रतीब्रास दरानुसार लिलावधारकास देय रकमेची परिगणना करण्यात यावी.

**३) लिलावाची रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज करण्याची कालमर्यादा:-**

लिलावधारकास लिलावाच्या कालावधीत वरीलपैकी कोणत्याही कारणास्तव वाळू उत्खनन करणे अशक्य असल्यास जास्तीत जास्त संबंधित वर्षाच्या डिसेंबर अखेरपर्यंत लिलावधारक यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे लिलावाची रक्कम / प्रमाणशीर रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर करण्यात आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**(४) खालील कारणास्तव लिलावाची रक्कम परत करण्यात येणार नाही :-**

वाळू/रेती निर्गती धोरणातील अटी व शर्ती तसेच निविदा सूचनेतील अटी व शर्तीनुसार लिलावधारकाने लिलावात भाग घेण्यापूर्वी, वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी

लिलावधारकाची आहे. त्यामुळे वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध नाहीत, वाळूगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळू आहे, वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळली नाही अशा कारणास्तव लिलावाच्या रकमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

**२२.** वाळू/रेती निर्गतीबाबत अथवा त्याअनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सूचना जर या शासन निर्णयातील काही तरतूदींशी विसंगत असतील तर अशा प्रकरणी या शासन निर्णयातील तरतूदी अंतीम समजून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या Sustainable Sand Mining Management Guidelines च्या अनुषंगाने आवश्यक ते दिशानिर्देश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक विवि/शिकाना३१४, दिनांक २०/१२/२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०३१९४०४३२११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c614 95ae8b4592f8dcc5b8a851a8, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2018.01.03 20:04:27 +05'30'

**(राजेन्द्र क्षीरसागर)**
शासनाचे सह सचिव

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मंत्रालयीन विभाग.
६) सर्व विभागीय आयुक्त.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व उपविभागीय अधिकारी.
९) सर्व तहसिलदार.
१०) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
११) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.

१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.

१४) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.

१५) सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१६) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई ४०० ०३२.

## विवरणपत्र

## वाळू/रेती लिलावाच्या अनुषंगाने इतर अटी व शर्ती :-

(१) लिलावधारकाला नदीपात्रातून /नाल्यातून रेती /वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्याक्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

(२) लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

(३) लिलावधारकाने रेती / वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणा-या अधिका-यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

(४) लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

(५) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

(६) लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील रेती / वाळूची वाहतूक करणा-या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक करावी. वाहनक्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी. दंडनीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावा.

(७) रेती/वाळूचे उत्खनन करताना अथवा वाहतुक करताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

(८) लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

(९) रेतीचे/ वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहीजे.

(१०) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही, या अटी करारनाम्यात अंतर्भूत कराव्यात.

(११) लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

(१२) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू /रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत. याबाबत लिलावधारकाशी करावयाच्या करारपत्रात अशाप्रकारची अट अंतर्भूत करण्यात यावी.

(१३) शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

(१४) लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या वाळूघाटातून उत्खनन केले आहे, त्याबाबतचे विवरणपत्र दर महिन्याच्या १० तारखेला जिल्हाधिकारी यांना सादर करणे सक्तीचे आहे. प्रत्यक्षात अशी विवरणपत्रे लिलावधारकाकडून सादर केली जात नाहीत, असे आढळून येत आहे. त्यामुळे जे लिलावधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांना असतील.

(१५) लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती / वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.

(१६) एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत रेती / वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव रेतीचा / वाळूचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार

नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

(१७) अवैध वाळू / रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील नियम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

(१८) विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांनी शासकीय / निमशासकीय, स्वायत्तसंस्था व सहकारी संस्था यांना कोणत्याही कामासाठी वाळू / रेतीगट राखीव ठेवू नये तसेच कोणत्याही प्रकारचा परवाना देण्यात येऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत वाळूगट राखून ठेवणे किंवा परवाना द्यावयाचा झाल्यास असा प्रस्ताव राज्य शासनास पाठवावा. त्यावर राज्य शासन निर्णय घेईल.

(१९) लिलावधारकाने /परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहीती तहसिलदार/ जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(२०) अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांनी वाळूची वाहतूक करणा-या ट्रकना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतूकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येईल, याबाबत लिलावधारकाशी चर्चा करुन निर्णय घ्यावा.

(२१) वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकीबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

**************.